परिशिष्ट - 1 (ANNEXURE - I)

भाग I : मुंबई येथील महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.च्या 2021-22 या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षित खात्यांच्या अंतिमीकरणासंबंधी घटनाक्रम

अनु. क्र.	कार्य	दिनांक व कालावधी
1	वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्तीची तारीख	17.01.2022
2	वैधानिक लेखापरीक्षकांनी नियुक्ती स्वीकृती दिल्याची तारीख	29.07.2022
3	वार्षिक हिशेब लेखापरीक्षकांकडे सुपूर्द करण्याची तारीख	24.11.2022
4	लेखापरीक्षकांनी हिशेबांचे परीक्षण करण्यास घेतलेला वेळ	सात महिने
5	लेखापरीक्षकांकडून प्रश्न (queries) प्राप्त झाल्याची तारीख	09.06.2023
6	लेखापरीक्षणातील प्रश्न निकाली काढण्यास घेतलेला वेळ	एक महिना
7	वार्षिक खात्यांचे अंतिमीकरण (मंडळामार्फत स्वीकृती)	27.07.2024
8	वैधानिक लेखापरीक्षकांचे अहवाल दि.01.04.2025 रोजी प्राप्त झाले होते. तद्नंतर महालेखाकार यांच्या लेखा परिक्षणातील आक्षेपांची पूर्तता करुन सुधारीत वैधानिक लेखापरीक्षण अहवाल महामंडळाकडे प्राप्त झाल्याची तारीख	20.06.2025
9	ताळेबंद व नफा तोटा पत्रक, वैधानिक लेखा परिक्षकांच्या अहवालासह महालेखाकार यांचे कडे दि.04.04.2025 रोजी सादर करण्यात आले. तद्नंतर महालेखाकार यांचे आक्षेपांची पूर्तता करुन सुधारित लेखे महालेखाकार यांचे कडे सादर केल्याची तारीख	23.06.2025
10	महालेखाकार यांचे कडून लेखे प्रमाणित केल्याची तारीख	30.07.2025
11	महामंडळाचा वार्षिक अहवाल व लेखापरीक्षित वार्षिक हिशेब मंजूर झाल्याची तारीख (वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख)	30.09.2025
12	वार्षिक अहवाल व लेखापरीक्षित खात्यांचे भाषांतर (मराठी, हिंदी) करण्यासाठी लागलेला कालावधी	दिड महिना
13	वार्षिक अहवाल व लेखापरीक्षित खात्यांची प्रत मंत्रालयाकडे टेबलवर मांडणीसाठी पाठविण्याची तारीख	

परिशिष्ट - 2 (ANNEXURE - II)

भाग II : 2021-22 च्या वार्षिक अहवालाचे संसदेत वर्षअखेरीपासून नऊ महिन्यांच्या आत सादरीकरण न होण्याची सविस्तर कारणे (वर्णनात्मक स्वरूपात)

i) आर्थिक वर्ष 2021-22 साठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करण्याबाबतचे पत्र क्र. 1927 दिनांक 17.01.2022, CAG-III कडून प्राप्त झाले.

ii) सन 2021-22 चे हिशेब पुस्तके पूर्ण करण्यासाठी बारा महिने लागले.

iii) वित्त वर्ष 2019-20 पासून महामंडळाची खाती नवीन ERP-9 क्लाउड आधारित लेखा प्रणालीमध्ये स्थलांतरित करण्यात आली असून नवीन लेखा सॉफ्टवेअरचे कार्यज्ञान मिळवणे आणि त्याचा अवलंब करणे हे प्रारंभी महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक असल्यामुळे, महामंडळाच्य 13 विभागीय कार्यालये, 9 कारखाने आणि मुख्य कार्यालय, मुंबई येथे प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. सर्व व्यवहार योग्यरीत्या प्रतिबिंबित होत आहेत आणि नवीन प्रणालीमधून मिळणारे अहवाल अचूक आहेत याची लेखापरीक्षकांनी खात्री करून घेतली.

या सर्व कारणांमुळे तसेच सन 2019-20 व 2020-21 या दरम्यान कोविड-19 महामारीमुळे या वर्षीचे हिशेब सर्वोतोपरि पूर्ण करण्यास विलंब झाला. परिणामी सन 2021-22 चे हिशेब पुर्ण करण्यास विलंब झाला.

iv) महालेखाकार यांचे निरीक्षण/टिप्पण्या 13.05.2025 रोजी प्राप्त झाल्या.

v) महामंडळाचे 2021-22 या लेखावर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.30.09.2025 रोजी घेण्यात आली आणि 2021-22 या वर्षाचे स्वतंत्र तसेच एकत्रित खाते दि. 30.09.2025 रोजी मंजूर व स्वीकृत करण्यात आले.